पुढारी

# एटीकेटी, बॅकलॉगच्या २५ हजार विद्यार्थ्यांची माहिती मागविली

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील एटीकेटी, बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांची माहिती राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मागविली आहे. त्यानुसार विद्यापीठाकडून माहिती संकलित करण्याचे काम सुरू झाले आहे.

अकृषी विद्यापीठे आणि व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसंदर्भातील निर्णय राज्य सरकारने जाहीर केला आहे. परीक्षा देणारे व परीक्षा न देणाऱ्या विद्यार्थ्यांकडून लेखी घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रात एटीकेटी, बॅकलॉगचे सुमारे २५ हजार विद्यार्थी आहेत. एटीकेटी, बॅकलॉगचा निर्णय अद्याप सरकारकडून झालेला नाही, त्यामुळे या विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. कुलगुरू, अधिकाऱ्यांची लवकरच बैठक घेण्यात येणार असल्याचे कळते.



शिवाजी विद्यापीठातून...

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मागविलेली माहिती मंगळवारपासून देण्याचे कामकाज सुरू होणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.